ISBN -978-93-84309-11-4

SAVITRIBAI PHULE
PUNE UNIVERSITY, PUNE

NAAC Accreditation'A' Grade

**Junnar Taluka Shivner Shikshan Prasarak Mandal's**

# Shri Shiv Chhatrapati College

*Bodkenagar, Junnar (Pune)*

**National Seminar on**

# Status of Judicial Activism in India

Editor -In-Chief
**Prof. Rahul Pandit**

Principal
**Dr. Bhaskar Shelke**




Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

# National Seminar on

# Status of Judicial Activism in India

***organized by***
***Department of Political Science***

Date : 12 th & 13 th February 2016.

**Editor-in-cheif**
**Prof. Rahul B. Pandit**
**Head of the Department,**
Department of Political Science

**Co-Editor**
**Prof. A. S. Patil**
Department of Political Science

**Co-Editor**
**Prof. V.V. Rankhamb**
Department of Political Science

**Publisher**
**Principal**
**Dr. Bhaskar Shelke**
**Shri Shiv Chhatrapati College**
*Bodkenagar, Junnar (Pune)*

© **Publisher**

**Publication**
**Shabdshri Publication, Junnar**

(The Editor, Editorial Board & Publisher assume no responsibility for statements and opinions expressed by the authors in this souvenir Abstract)

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| 38 | भारतीय न्यायव्यवस्थेतील कौटुंबिक न्यायालयाची भूमिका | प्रा . धिरज भिमशा शाखापुरे . | १३२-१३४ |
| 39 | न्यायालयीन स्वातंत्र्य आणि भारतीय संसद | प्रा. हारगे महादेव माणिकराव | 135.137 |
| 40 | न्यायालयीन कार्यपध्दतीत मानसशास्त्रीय संकल्पनांचे उपयोजन | प्रा. खिलारे संदीप सिताराम | 137.139 |
| 41 | जनहित याचिका व न्यायालयीन भूमिका | प्रा. शरद मनसुख | 140.141 |
| 42 | लोकशाही सशक्तीकरणासाठी न्यायालयीन सक्रियतेची भूमिका | प्रमोद भगवानराव जाधव | 142.145 |
| 43 | मानवीहक्कांचे संरक्षण व न्यायालयीन सक्रीयता | प्रा. एकनाथ वाजगे | 146.148 |
| 44 | भारतीय राज्यघटना व न्यायालयीन सक्रीयता | श्री. सचिन नागोराव कसबे | 149.151 |
| 45 | भारतीय न्यायालयीन सक्रीयता एक दृष्टीक्षेप | कुचेकर एच. एस. | 152.154 |
| 46 | न्यायालयीन सक्रियेतेच्या भूमिकेमुळे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाची कोंडी? | प्रा. राजेंद्र भोईवार | 155-157 |
| 47 | न्यायपालिकेची सक्रीयता | प्रा. चंदन गणेशराज सोनाळे | 158.159 |
| 48 | न्यायालयीन सक्रियता : कारणे आणि उपाय | प्रा. डॉ. विलास आघाव<br>प्रा. डॉ. सुधाकर भालेराव | 160.162 |
| 49 | **केशवानंद भारती खटला** | **प्रा.राहुल पंडित विशाल रणखांब** | **१६३-१६४** |
| 50 | भारतातील न्यायालयीन कृतिशीलता | डॉ. बेग रेहानाआरा इस्माईल | 165.168 |
| 51 | मानवी हक्काचे संरक्षण आणि न्यायसंस्थेची भुमिका | प्रा.साळवे गौतम गणपती | 169.172 |
| 52 | जनहित याचिका :सामाजिक न्यायाची संकल्पना | प्रा. मिरकुटे ई.जी..<br>डॉ. आर . डि. शिंदे | 173.174 |
| 53 | जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रीयता | प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव | 175.176 |
| 54 | संसद, न्यायालये आणि संविधान | प्रा. माधव चोले | 177.179 |
| 55 | भारतातील न्यायालयीन सक्रियता : एक अभ्यास | प्रा. काटकांबळे ना. तुकाराम | 180.185 |
| 56 | राष्टीय एकातमतेत आणि न्यायववसथेत भारतीय राज्य घटनेची भूमिका | डॉ. प्रभाकर जगताप | 186.188 |
| 57 | डॉ. बी आर. आंबेडकर आणि न्यायपालिका | मकरंद रामराव गिरी | 189.192 |
| 58 | मानवी संरक्षणात्मक कायदे आणि न्यायालयाची भूमिका | प्रा. एल.एन.कुमारे | 193.195 |
| 59 | मानवी हक्क आणि न्यायव्यवस्था | बबन गोविंद राठोड | 196.197 |
| 60 | जनहित याचिकेमध्ये न्यायालयाची भूमिका | चौधरी प्रदीप विनायक | 198.200 |
| 61 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : ग्रामीण विकास आणि न्यायविषयक दृष्टिकोन | कमले हणमंत विठ्ठलराव | 201.205 |
| 62 | भारतीय राज्यघटनेच्या संरक्षणामध्ये न्यायालयीन पुनर्विलोकनाची भूमिका | पटेकर संजय कारभारी | 206.208 |
| 63 | न्यायालयीन सक्रीयता आणि भारतीय लोकशाही | व्हि. एस. संबेटवाड | 209.210 |
| 64 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे न्यायव्यवस्थे विषयक विचार | कढरे चंद्रकांत सिध्दार्थ | 211.212 |


Scanned by CamScanner

ISBN -978-93-84309-11-4

# केशवानंद भारती खटला

प्रा.राहुल पंडित
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर

विशाल रणखांब,
संशोधक विद्यार्थी,
राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

भारत हे एक लोकशाही राष्ट्र आहे. या राष्ट्राच्या संविधानाने लोकशाहीची प्रमुख तीन अंगे कल्पिली आहेत. कायद्याची निर्मिती करणारे कायदेमंडळ, त्यांची अंमलबजावणी करणारे कार्यकारी मंडळ व त्यावर अंकुश ठेवून नागरिकांचे हक्क संरक्षण करणारे न्यायमंडळ; त्यांच्या मर्यादाही संविधानात अंतर्भूत आहेत. पण संसद सार्वभौम आहे असे म्हणणारे हे विसरतात की, संविधानाच्या उद्देशिकेप्रमाणे सार्वभौम मलोकम आहे व मगणराज्यम आहे; मसंसदम नव्हे. भारताच्या लोकांनी भारताचे सार्वभौम गणराज्य घडविण्याचा संकल्प करुन हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन स्वतः प्रत अर्पण केलेले आहे आणि स्वतंत्र न्यायप्रणाली हे नागरिकांच्या सुरक्षेचे कवच आहे. व्यक्तीचे मूल्य व स्वातंत्र्य जोपासण्याची जबाबदारी राज्यघटनेने न्यायालयावर सोपविली आहे. (धर्माधिकारी;२००८:१४-१५)

केशवानंद भारती खटल्याचा निर्णय देताना न्यायालयाने नेमकी हीच जबाबदारी पार पाडली'. भारतीय राज्यघटनेच्या बेसिक स्ट्रक्चरचा (मूलभूत घटक) सिध्दांत या निर्णयाने प्रस्थापित झाला. या खटल्यात न्यायालयाने संसदेचा घटना दुरुस्तीचा अधिकार मान्य केला. परंतु मौलिक संरचनेचा सिध्दांत (इरीळल्ॅ ीींीलींीीश उेलीीळपश)सांगून संसदेच्या घटना दुरुस्तीच्या अधिकारावर मर्यादा आणल्या. (जाधव आणि शिरापूरकर;२०११:८०-८८)

राज्यघटनेतील कोणती वैशिष्टये महत्वाची व अपरिवर्तनीय समजली जावीत, कोणता भाग हे घटनेचे मुलभूत घटक आहेत असे समजावे याबद्दल न्यायमूर्ती नानी पालखीवाला आणि इतर काही न्यायमूर्तींनी त्यांच्या निकालपत्रात या मुलभूत घटकांचा उल्लेख केला आहे.

१. **राज्यघटनेचे श्रेष्ठत्व**
२. **भारताचे सार्वभौमत्व**
३. **राष्ट्राची एकता आणि अखंडता**
४. **लोकशाही जीवनपध्दती**
५. **शासनाचे प्रजासत्ताक स्वरुप**
६. **राज्यघटनेच्या सरनाम्यात आणि तिस-या भागात नमूद केलेले नागरिकांचे मुलभूत हक्क व त्यांना दिलेली हमी.**
७. **संविधानाचे धर्मनिरपेक्ष स्वरुप**
८. **स्वतंत्र न्यायमंडळ**
९. **संविधानाचे संघराज्यात्मक स्वरुप**
१०. **कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्यातील समतोल**
११. **संसदीय प्रणाली**
१२. **घटनादुरुस्तीची विशेष पद्धत**

'केरळमधील एका मठाचे अधिपती स्वामी केशवानंद भारती यांनी मठाच्या जमिनीची मालकी व व्यवस्थापनाबद्दल राज्य सरकार करु इच्छित असलेल्या कारवाईला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. मकेशवानंद भारत विरुध्द केरळ राज्य आणि इतरम (अखठ १९७३, डउ१४६१) या नावाने भारतीय न्यायसंस्थेच्या



Scanned by CamScanner

इतिहासात प्रसिध्द असलेल्या या खटल्याने संसद आणि न्यायालय यांच्या अधिकार क्षेत्राबद्दल नव्या सीमारेषा आखल्या. (चपळगावकर ; २००८:२९)

मुलभूत घटकांची ही यादी परिपूर्ण नाही, ती म क्त उदाहरणरुप आहे. असे न्यायालयासमोर प्रतिपादण्यात आले होते. (चपळगावकर ; २००८: ३२) राज्यघटनेत दुरुस्ती कोठपर्यंत व किती करता येईल याचा विचार करताना न्या. हेगडे आणि न्या. मुखर्जी यांनी धर्मसुधारणेचे उदाहरण दिले आहे. कोणत्याही धार्मिक आचारात आणि विचारात सुधारणा होऊ शकते. पण या सुधारणेमुळे धर्माचा मूळ आधार मात्र बदलता येत नाही. तो कायम असतो. तीच मर्यादा घटनेतील दुरुस्तीबद्दलची आहे. असे त्यांचे मत होते.(चपळगावकर;२००८:३०)

केशवानंद भारती खटल्याच्या निर्णयामुळे घटनेचे मुलभूत रुप अबाधित राहिले. एका अर्थाने मुलभूत हक्कांना मजबूत करणारी,
बळ देणारी ही तरतूद आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, सामान्य माणूस संविधानाचा म क्त विषय न राहता तो मविधाताम ठरावा, ही आपल्या लोकशाहीची भूमिका आहे. ती कार्यान्वित करण्यासाठी आपण मकायदयापुढे सर्व समानम हे तत्व स्वीकारले. जेव्हा जेव्हा लोकशाहीचे मार्ग बंद होतात आणि जनमताचाही उपयोग होत नाही तेव्हा तेव्हा व्यक्ती व माणसाचे मूल्य आजवर म क्त न्यायालयानेच सांभाळलेले आहे. ज्या ज्या वेळी लोकमत जागृत होणे असंभव झाले, सरकारचे अत्याचार वाढले व लोकांच्या पाठीशी कुणीच उभे राहत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली तेव्हा व्यक्तीचे मूल्य व स्वातंत्र्य न्यायालयानेच जोपासले आहे.

संदर्भ :-

Austin Granville, 1972, The Indian Constitution : Cornerstone of a Nation, New Delhi, OUP. Basu D.D. 2001, Introduction to the constitution of India, Nagpur, Wadhwa. चपळगावकर नरेंद्र, २००२, राज्यघटनेचे अर्धशतक, मुंबई, मौज प्रकाशन चपळगावकर नरेंद्र,२००८, विधीमंडळ आणि न्यायसंस्था संघर्षाचे सहजीवन, मुंबई, मौज प्रकाशन जाधव तुकाराम आणि शिरापूरकर महेश, २०११, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, पुणे, द युनिक ॲकॅडमी, धर्माधिकारी चंद्रशेखर, २००८, मप्रस्तावनाम , चपळगावकर नरेंद्र,विधीमंडळे आणि न्यायसंस्था संघर्षाचे सहजीवन, मुंबई, मौज प्रकाशन भोळे भास्कर, २०००, मसंविधानिक मूल्यांचा अर्धशतकाचा प्रवासम, विचारशलाका, ऑगस्ट,मार्च भोळे भास्कर, २००३, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण,नागपूर, पिंपळपुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स
.



Scanned by CamScanner